धक्का!!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. ३१ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १८१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## पवारांची गुगली अन् पहिल्या यादीतील संधी हुकली; महाजन गो बॅकचा नारा अन् रद्द झाला अकलूजचा दौरा

# महाजन येवो वा देवेंद्र!
## आता दादा म्हणाले तरी
# कमळ नाही म्हणजे नाही 'च'

**अहो महाजन येवो, नाही तर देवेंद्र येवो निर्णय घेतला की घेतला, आता 'दादासाहेबांनी' जरी सांगितले तरी कमळ नाही म्हणजेच नाही'च'...**

मोहिते पाटील परिवाराची नाराजी दूर करण्यासाठी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांच्या भेटीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खास दूत म्हणून गिरीश महाजन शिवरत्नवर येणार हे वृत्त धडकताच आक्रमक बनलेल्या मोहितेपाटील समर्थकांनी 'महाजन गो बॅक' हा हॅशटॅग वापरत सोशल मिडीयावर मोहिम छेडली आणि महाजनांना यांचा दौरा रद्द करावा लागला. धैर्यशील मोहिते पाटील यांनी 'तुतारी' वाजवावी असा कार्यकर्त्यांचा कमालीचा आग्रह असला, तरी 'तुतारी'च्या कालच्या यादीत माढ्याचा उमेदवार जाहीर झाला नाही. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी परवा साताऱ्यात टाकलेल्या गुगलीचे पडसादही काल दिवसभर अकलूजमध्ये घुमत होते.

धैर्यशील मोहिते-पाटील यांना खासदारच करायचं असे मनोमन ठरवलेल्या मोहिते-पाटील समर्थकांनी थेट भाजपशी भिडण्याचा नारा सुरू केला. गिरीश महाजन अकलूजला मोहिते पाटलांची नाराजी दूर करण्यासाठी पुन्हा येणार असे कळताच कार्यकर्त्यांनी 'महाजन गो बॅक' चा नारा दिला. भाजप माढ्याचा उमेदवार बदलणार नव्हते. धैर्यशील मोहिते पाटील यांना ते पक्षातून उमेदवारी देणार नव्हते आणि मोहिते पाटील यांना विश्वासात न घेता उमेदवार जाहीर करण्याचे धाडस जर भाजप दाखवत असेल तर त्या पक्षाशी निष्ठा आम्ही का म्हणून ठेवायची? अशी कार्यकर्त्यांची आक्रमक विचारणा होती.




शनिवारी गिरीश महाजन पुन्हा एकदा अकलूजला मोहिते पाटील कुटुंबीयांच्या मनधरणीसाठी येणार म्हटल्यावर महाजनांच्या स्वागतासाठी ना कार्यकर्ते उत्साही होते ना इथले नेते. जर महाजन येणारच असतील तर त्यांना अकलूजमध्येच अडवून सांगू तुमची शिष्टाई आम्हाला नको आणि तुमचा पक्ष देखील आम्हाला नको. आत्तापर्यंत जो कार्यकर्ता फक्त खासदारांवरच नाराज होता तो थेट भाजपवरच नाराज झालेला दिसून आला. गिरीश महाजन येणार म्हणून शिवरत्न वर उत्साह नव्हता ना लगबग नव्हती. मोहिते पाटील कुटुंबीयांची साधी उपस्थिती देखील नव्हती किंवा कार्यकर्त्यांची वर्दळही!

भाजपमध्ये आपल्याला किंमत नसेल तर तिथे थांबून करायचेच काय? आमदार आपला नाही, खासदार आपला नाही, भाजप आपला नाही.मग आपण फक्त यांचा प्रचारच करायचा का? माढा लोकसभा मतदारसंघाचा विचार करता भाजप या पक्षावरच काहीसे लोक नाराज झालेले दिसत आहेत. भाजप सोडून तुम्ही कायपण बोला आम्ही तुम्हाला साथ देऊ अशी साद मोहिते-पाटलांना संवाद दौऱ्यात कार्यकर्त्यांनी दिली आहे.भाजपवाल्यांनी आपल्याकडे येऊन मनधरणी करण्यापेक्षा, त्यांचा पक्षच आपल्याला नको. अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली आहे.आता थेट तुतारीच हातात घ्यायची आणि धैर्यशील भैय्यांना खासदारकी द्यायची... अशीच प्रबळ इच्छा इथल्या कार्यकर्त्यांची झाल्याने.. गड्या आपली तुतारीच बरी.. असे वातावरण झाल्याचे दिसत आहे.कारण तुमचा नकार आम्हाला पचणार नाही, आणि तुमच्या शिष्टाईचा बहाणा आम्हाला रुचणार नाही. कारण मोहिते पाटील समर्थकांना आता चिड आली आहे भाजपच्या बहाण्याची, अशाच प्रतिक्रिया कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत होत्या. तसेच स्टेटस् ठेवण्यात आले होते. दरम्यान, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या लोकसभेच्या पहिल्या पाच उमेदवारांची यादी आज शनिवारी जाहीर केली. यामध्ये माढा लोकसभेचा उल्लेख नव्हता. उर्वरीत जागांची यादी लवकर जाहीर करु,असं त्यांनी यावेळी सांगितलं.

आज घोषित झालेल्या यादीमध्ये माढ्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांचं नाव येणं अपेक्षित होतं. संभाव्य यादीमध्ये मोहिते-पाटील यांचं नाव असल्याची चर्चादेखील होती. पण नाव न आल्यानं मोहिते-पाटील गटावर 'वेट अॅंड वॉच'मध्ये राहण्याची वेळ आली.

लोकसभा निवडणुकीमधील जागा वाटपाचा तिढा जसाजसा सुटु लागला आहे, तसंतसं उमेदवारांच्या याद्या जाहीर होऊ लागल्या आहेत.बहुप्रतिक्षीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या यादीमध्ये बारामती : सुप्रिया सुळे, वर्धा : अमर काळे, दिंडोरी : भास्कर भगरे, अहमदनगर : नीलेश लंके, शिरुर : डॉ. अमोल कोल्हे यांच्या नावाचा समावेश आहे

शरचंद्र पवार गटाकडून रासपच्या महादेव जानकर यांना उमेदवारी देण्याचे निश्चित करुनदेखील ती नाकारत जानकर हे महायुतीत डेरेदेखील झाले. त्यामुळे आपसूकच माढ्याची जागा खुद्द राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट लढणार हे निश्चित झालं. त्यातून इथल्या जागेवर धैर्यशील मोहिते-पाटील यांचं नावं घोषित होईल, असे वाटत होते. मात्र, हा निर्णय लांबणीवर गेल्याचं स्पष्ट झालं.

दरम्यान, ज्येष्ठ नेते शरद पवाराचं राजकारण अद्याप भल्याभल्यांना आजवर कळालं नाही म्हणतात. पवार हे कोणता डाव टाकतील, राजकारणाच्या कोणत्या सोंगट्या टाकून एखाद्याला संपवतील की झुलवत ठेवतील याची कधी मेळ लागत नाही. या हाताचं त्या हाताला कळू न देणारे बारामतीकर पवार हे राजकारणातील अजब रसायन मानलं जातं. ते अगोदर जी दिशा सांगतात, त्याच्या अगदी विरुध्द करतात.

ज्येष्ठ नेते शरद पवार काल सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. सातारा आणि माढा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा दौरा होता. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेच्या अजेंड्यावर सुरवातीला सातारा लोकसभेचा विषय होता. सातारा लोकसभेच्या अनुषंगिक प्रश्नांची उत्तरं पवार यांच्याकडून मिळाल्यानंतर माढावर पत्रकारांनी आपला मोर्चा वळविला. या भूमिकेबाबत ते म्हणाले, माढा मतदार संघात धनगर समाजाची लोकसंख्या अधिक आहे. या समाजाच्या एका नेत्याला प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळेल, म्हणून इथली जागा या नेत्याला देण्याबद्दल चर्चा झाली होती. त्यांनंतर काय झाले माहित नाही. 'आत्तापर्यत पक्ष पळवितात हे माहिती होतं, त्यांनी हा उमदेवारच पळविला असे दिसते' असा टोला लगावत शरद पवार यांनी गुगली टाकली ती अकलुजला अस्वस्थ करणारी!.

माढ्याच्या उमेदवारीबद्दल धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह कोणाशीच चर्चा झाली नाही, असं शरद पवार यांनी यावेळी ठोकून दिलं. यासंबंधीचं वृत्त अकलूजच्या मोहिते-पाटील आणि त्यांच्या समर्थकांमध्ये पोचलं त्यावेळी सगळेजण जणू आवाक झाले. शरद पवारांच्या या विधानसंदर्भात खातरजमा करण्यासाठी कार्यकर्त्यांची फोनाफोना सुरु झाली. शरद पवारांची साताऱ्यातील पत्रकार परिषदेसंबंधीची ती क्लीप पाठविण्याबद्दल धडाधड निरोप सुरु झाले. मोबाईल्या स्क्रीनवर मेसेज उमटू लागले. शरद पवारांनी ऐनवेळी कात्रजचा घाट दाखविला का काय? यावरुन शंकाकुशांचं वादळ कार्यत्यांच्या मनामध्ये घोळू लागलं.

साताऱ्यात पवार यांनी केलेल्या त्याच विधानावर आजदेखील कार्यकर्त्यांमध्ये चर्चा रंगली होती. नेमकं शरद पवार असं कसं म्हणाले, याचे उत्तर मिळावे, यासाठी बाळदादा ऊर्फ जयसिंह मोहिते-पाटील तसेच धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह मोहिते-पाटील परिवारातील सदस्यांना समर्थक फोन लावत होते.

### मोहिते-पाटलांना नको होते महाजन 'शिवरत्न'वर

ज्येष्ठ नेते विजयदादा यांच्याशी चर्चा करुन काही तोडगा निघतोय हे पाहण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांचा शिवरत्न बंगल्यावर आज दौरा होता. मात्र, खुद्द मोहिते-पाटील परिवाराचीच त्यांच्या दौऱ्याबद्दल नाराजी होती. त्यांनी अशा परिस्थितीत यायला नको, हीच भूमिका मोहिते-पाटील परिवाराची होती. त्यातून महाजन यांच्या स्वागतासाठी कोणीच शिवरत्न बंगल्यावर थांबले नव्हते.

### तरीही असं कसं?

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटात प्रवेश करुन तुतारीच्या चिन्हावर धैर्यशील मोहिते-पाटील यांचा लढण्याचा निर्णय पक्का झाला आहे. शरद पवार यांच्याशी चर्चादेखील झाली आहे. केवळ पक्ष प्रवेशाची औपचारिकता राहिली आहे. आपलं ठरलंय, माघार नाहीच असं छातीठोकपणे बाळदादा सांगत असताना शरद पवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उमेदवारीबद्दल चर्चाच नाही असं कसं म्हणून शकतात? यावर अद्यापही खल सुरु आहे.

### ...अन् महाजनांचा दौरा रद्द

माढा लोकसभेच्या उमेदवारीवरुन भाजपावर नाराज झालेले मोहिते-पाटील समर्थक प्रचंड संतापलेले आहेत. खुद्द मोहिते-पाटील परिवारासह त्यांचे समर्थक कोणाचेच काही ऐकण्याच्या मानसिक स्थितीत नाहीत. नाराजी दूर करण्यासाठी येणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांना 'शिवरत्न' बंगल्यावर जाण्यापासून अकलूजमध्ये अडविले जाणार असल्याचे, तसे स्टेटस् समर्थकांनी ठेवले आहेत, शिवाय मोहिते-पाटील परिवारातील सर्व सदस्य हे माढा मतदार संघात दौऱ्यावर आहेत, ही सगळी खबर पोलीस यंत्रणेकडून गृहखात्याला कळविण्यात आली. एकूणच सगळा रांगरंग पाहता मंत्री गिरीश महाजन यांचा अकलूज दौरा रद्द करण्यात आल्याचे भाजपाच्या मुंबईस्थित वरिष्ठ सुत्रांकडून हे सांगण्यात आले.




## फडणवीसांचे
# एका दगडात तीन पक्षी

### जानकरांचं हर हर महादेव परभणीत नाईक-निंबाळकरांचं हर घर मोदी माढ्यात!

**राजकारणात गॉडफादर महत्वाचा. गॉडफादराच्या आशीर्वादाचा हात जर डोक्यावर असेल तर संबंधित नेत्याचं राजकारणातलं करिअर अधिकच बहरतं. आपला नेता किती अडचणीत आला तर गॉडफादर संकटमोचक म्हणून संबंधिताच्या पाठिशी उभा राहतो. फक्त त्यासाठी गॉडफादरचा विश्वास संपादन करायला हवा. गॉडफादरच्या मनाच्या गाभाऱ्यात संबधिताची तशी जागा निर्माण व्हायला हवी. होय, त्याचाच प्रत्यय राज्याच्या राजकीय पटलावर चर्चेत असलेल्या माढा मतदार संघात आलाय. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबतीत असं काही घडलंय.**



विद्यमान खासदार नाईक-निंबाळकर यांना माढ्यातून दुसऱ्यांदा भाजपातर्फे उमेदवारी देण्यात आली आहे. तथापि, मोहिते-पाटील यांनी त्यांच्या उमेदवारीला हरकत घेऊन विरोधात आव्हान दिले. त्यातून नाईक-निंबाळकर हे अडचणीत आले असतानाच महादेव जानकर यांची याच मतदार संघात महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार पुरस्कृत उमेदवारी पडणार होती. या मतदार संघात धनगर समाजाचे मतदान मोठे असल्याने रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे अधिकच अडचणीत आले. भाजपाची इथली हक्काची जागादेखील अडचणीत आली, जी जागा खास देवेंद्र फडणवीस पुरस्कृत आहे.





खासदार नाईक-निंबाळकर यांच्यासाठी पर्यायाने भाजपाला फटका बसणारी ही घडामोड उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या कानावर जाताच त्यांनी अत्यंत तातडीनं चक्रे फिरविली. जानकर यांना बोलावून घेऊन महायुतीच्यावतीने परभणीतून लढण्याची सोय करु, असे सांगितले. शरद पवार यांच्या गोटात गेलेल्या महादेव जानकर यांना फडणवीस यांनी वळविले. अवघ्या २४ तासात हे सगळं साध्य केलं. ठरल्याप्रमाणं महादेव जानकर यांच्या उमेदवारीची घोषणा आज झाली. माढ्यातून लढणारे जानकर हे आता परभणीतून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून लढतील. देवेंद्र फडणवीस यांनी एका दगडात तीन पक्षी मारले. माढ्यातील रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांची अडचण सोडवली. महादेव जानकर यांना आपल्याच वळचणीला ठेऊन त्यांची लढण्याची अडचण दूर करण्याबरोबरच आपल्या समाजाच्या नेत्याला संधी दिली म्हणून धनगर समाजदेखील भाजपाच्या पर्यायानं महायुतीच्या पाठीशी लोकसभेच्या निवडणुकीत येईल, असं गोळाबेरजेचं राजकारण फडणवीस यांनी केलं.

**उन्हाळ्याची प्रचंड तीव्रता जशी वाढतेय त्याप्रमाणं सोलापुरात पाण्याची समस्या भीषण रुप धारण करतेय. सोलापुरातील हद्दवाढ सारख्या भागात सहाव्या किंवा सातव्या दिवशी पाणी येतय. पाण्याच्या समस्यांनी नागरिक हैराण होताहेत. लोकसभेच्या कित्येक निवडणुका आल्या अन् गेल्या. पण सोलापूरकरांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला नाही. इथल्या पाण्याच्या प्रश्नाला प्रत्येक निवडणुकीवेळी सोईस्कररित्या रंग देण्यात आला. पाण्याच्या प्रश्नावर राजकारण झालं. 'त्या' 'त्या' वेळी तापलेल्या तव्यावर राजकारण्यांनी भाकरी भाजून घेतली. काँग्रेस असो की भाजपा यापैंकी कोणीच सोलापूरचा पाण्याचा प्रश्न मिटविला नाही. पाणीपुरवठ्याचा मुद्दा सध्याच्या लोकसभेच्या निवडणुकीतही ऐरणीवर आला आहे. वर्षभराची ३६५ दिवसांची पाणीपट्टी भरणाऱ्या सोलापुरकरांना २०० दिवसदेखील नियमीत आणि पुरेशा दाबाने पाणी पुरवठा केला जात नाही. नागरिकांचा पाण्याचा संताप या निवडणुकीत निघू शकतो. प्रत्येक निवडणुकीला वेळ मारुन नेणाऱ्या राजकारण्यांना पाण्याची किंमत इथली जनता दाखवून देईल, असं जनमत आहे.**



### सत्ताधारी विरोधक तर विरोधक सत्ताधारी झाले
# पालथ्या घड्यावरही थेंबभर पाणी नाही पडले



१२ लाखांहून अधिक लोकसंख्येच्या सोलापुरात पाण्याचं वास्तव भीषण आहे. महापालिका हद्दीमधील रहिवाशांकडून पाणीपट्टीसह अन्य करांची वसूली छताडावर बसून करणाऱ्या पालिकेला नागरिकांना पिण्याचं पाणी नियमीत आणि पुरेशा दाबानं देण्याचं सोयरसुतकच राहिलं नाही. शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवता येत नाही म्हणून काँग्रेसवाल्यांवर खापर फोडणाऱ्या भाजपानं इथला पाणीपुरवठा सुरळीत करण्यात काय दिवे पाजळले? हा मुद्दा महत्वाचा आहे. पाणीपुरवठ्यासह अन्य नागरी सुविधा सोलापुकरांना चांगल्या पुरवू या आश्वासनावर निवडून आलेल्या भाजपानं काय सुविध्या पुरविल्या? हे पाच वर्षात अनुभवलंय! काँग्रेस सत्तेत असताना सोलापूर शहरात एक दिवसाआड किंवा जास्तीत जास्त दोन दिवसाआड



पाणीपुरवठा होत होता. भाजपाच्या राजवटीत हा पाणीपुरवठा आता पाच दिवसाड-सहादिवसाआड गेला. याचं खापर कोणाच्या मस्तकावर फोडायचं? सोशिक अन् सहन करणाऱ्या तमाम सोलापूरकरांवरच ना?सहा दिवसदिवसाआड पाणी येतं ते पुरेशा दाबानं येत नाही. पाणीपुरवठ्याचं निश्चित वेळापत्रक नसतं. रात्री-अपरात्री पाणी येतं. ते भरण्यासाठी जागरणंही सोलापूरकरांनी सोसलं. पण त्यासाठी कामधंदा बुडवावा लागतो, त्यातून रोजगार बुडतो. नळपाणीपुरवठा नाही, तिथं पालिकेचे टँकर आहेत, असं दिमाखात सांगितलं जातं. पण, टँकर कधी येतो तर दोन-तीन दिवसातून एकदा. कडक उन्हात, पाय पोळत असताना टँकर येतो, काही घागरी भरून घेईपर्यंत टँकर रिकामा होतो, हेच भीषण वास्तव.

### आश्वासनांचा नुसताच बुडबुडा

समांतर जलवाहिनीचा प्रकल्प साकारतोय. नव्यानं एवढे-तेवढे जलकुंभ बांधले जात आहेत, अमृत योजनेतून शहराच्या अनेक भागात जलवाहिन्या टाकून पाणीपुरवठ्याची अंतर्गत व्यवस्था बदलली जातेय, स्मार्ट सिटीतून सोलापूरची पाणीपुरवठा योजना स्मार्ट होतेय, पाकणी इथं आणखी एक जलशुध्दीकरण केंद्र उभारलं जातंय वगैरे पाणीपुरवठ्यासंबंधीची सगळी सगळी आश्वासन पाण्यातील बुडबुडण्याप्रमाणं विरली आहेत. काँग्रेस सत्तेवर असो की भाजपा. पाणीपुरवठ्याच्या संदर्भातील आश्वासनांचा केवळ बुडबुडा झाला.

### तीच ती कारणं ऐकून अक्षरशः आला वीट

पाण्याचं रामायण अन् महाभारत सोलापूरकरांसाठी नवीन नाही. उजनी लाईनला गळती, उजनी मायनस, दुबारपंपिंग, औज बंधारा कोरडा, जलशुध्दीकरण केंद्रातील वीजपुरवठा खंडित, अंतर्गत व्यवस्था नाही, पाणी साठवण क्षमता पुरेशी नाही, अशी कारणं इथल्या पाणीपुरवठ्यासंदर्भात पुढं केली जातात. वर्षानुवर्षे तीच कारणं...तीच पाण्याची समस्या...याचं सोलापूरकरांना अक्षरशः वीट आलाय. सत्तेचे कारभारी बदलून बदलले तरीपण 'पालथ्या घड्यावर पाणी' पडलं नाहीच.

### सोलापूरकरांच्या कुंडलीत नियमित पाण्याचा योग नाहीच का?

मागच्या कित्येक वर्षात किती निवडणुका आल्या अन् गेल्या. बऱ्याचदा लोकप्रतिनिधींची खांदेपालटही झाली. सत्ताधारी विरोधक झाले, विरोधक हे सत्ताधारी झाले. पण सोलापूकरांना पिण्याचं चांगलं पाणी नियमीतपणे देण्याच्याबाबतीत 'कोणाच्या दमदार नेतृत्वात पाणी दिसलं नाही'.महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठ्याच्या निधीवरुन राज्यकर्त्यांवर जबाबदारी ढकलून कातडी बचाव भूमिका घ्यायची, दुसऱ्या बाजूला नागरिकांच्या रोषाला सामारे जाण्याच्या हिमत नसणाऱ्या राज्यकर्त्यांनी महापालिकेवर जबाबदारी ढकलून जबाबदारीतून पळ काढायचा. पाणीपुरवठ्याची सोलापुरातील ही वर्षांनुवर्षांची रडारड पाहता नियमीत पाणीपुरवठ्याचा चांगला योगच सोलापूरकरांच्या कुंडलीत नसावा का?